'मधुक्रांती-२०२०'



# सातेरी मधमाशीच्या पेट्यांची देखभाल




प्रा. उत्तम सहाणे
(मो.नं. ७०२८९००२८९)
पीक संरक्षण शास्त्रज्ञ,
कृषी विज्ञान केंद्र, कोसबाड हिल,
ता. डहाणू, जि. पालघर


- पिलावळ कोठीतील मध म्हणजे माश्यांसाठी 'रिझर्व्ह स्टॉक'
- माणसाचा हक्क केवळ 'मधुकोठी'तील गोडव्यावर!
- फुलोरा टंचाईत मधमाश्यांना द्यावा साखरेचा 'सुधारस'
- पाली, मुंग्यांसारख्या शत्रूंपासून मधपेट्यांचे संरक्षण गरजेचे

**न**वीन मधुपालकाने सातेरी मधमाश्यांची पेटी आणल्यानंतर तिची व्यवस्थित काळजी घेणे महत्त्वाचे आहे. ही काळजी घेतली नाही तर मधमाश्या पेटी सोडून बाहेर उडून जाण्याची शक्यता असते. एकदा पेट्या ठेवायची जागा निश्चित केल्यानंतर त्या स्टँडवर ठेवाव्यात. त्यांचे मुंगळे, सरडे, पाली, मुंग्या यांपासून संरक्षण करणे गरजेचे आहे.

नवीन आणलेल्या पेटीमध्ये सर्व आठ फ्रेमपैकी तीन ते चार फ्रेम पोळ्यांनी भरलेल्या असतात. माश्यांची संख्या जसजशी वाढेल तसतशा त्या नवीन पोळी तयार करत असतात. नवीन पेटीमध्ये भरलेल्या फ्रेमसोबत रिकाम्या फ्रेम जास्त ठेवू नये. समजा चार फ्रेम भरलेल्या असतील तर पाचव्या फ्रेमच्या जागी एक डमी फ्रेम लावावी, म्हणजे पेटीच्या पिलावळ कोठीमध्ये अंधार राहील. माश्या जशा नवीन तयार होतील तशी एक एक फ्रेम लावत जावी. एकदा का पिलावळ कोठी पोळ्यांनी भरली की मग मधुकोठीतील दोन-दोन फ्रेम टप्प्याटप्प्याने ठेवत जाव्यात. या मधुकोठीतील फ्रेममधून आपल्याला मध मिळेल. पिलावळ कोठीतील मध कधीच काढू नये. कारण त्यातील मध वसाहतीमधील माश्या व त्यांच्या पिल्लांसाठी राखीव असतो. अतिरिक्त मध मधुकोठीमध्ये साठविला जातो. आपण फक्त याच मधावर हक्क दाखवू शकतो. पेटीतील पूर्ण मध काढण्याचा प्रयत्न केला तर सोन्याच्या अंड्याच्या हव्यासापोटी सोन्याचे अंडी देणारी कोंबडी कापावी आणि हातात काहीच मिळू नये, अशी परिस्थिती होईल! त्यामुळे पिलावळ कोठीतील मध हा माश्यांसाठी व मधुकोठीतील मध आपल्यासाठी समजावा.

**पेटीची तपासणी :** आठवड्यातून किमान एक वेळा प्रत्येक पेटीची तपासणी करावी. पेटी तपासणीची योग्य वेळ म्हणजे सकाळी १० वाजेच्या आत, जेव्हा उष्णता कमी असते. पेटीजवळ जाऊन निरीक्षण करताना आपण पुढील बाबी बघितल्या पाहिजेत.

पेटीच्या आत व बाहेर कामकरी माश्या बाहेरून पेटीत येताना त्यांच्या पायांचे निरीक्षण करावे. पायावर असलेल्या पराग परडीमध्ये त्या पराग आणतात तेव्हा



पाय लाल, पिवळे दिसतात. याचा अर्थ माश्या चांगल्या प्रकारे काम करतात असे समजावे. तपासणी करताना माशी डंख मारू नये म्हणून अंगरक्षक कपडे घालावेत किंवा किमान डोके व चेहरा झाकण्यासाठी चेहऱ्यावरील जाळी आणि हातात प्लॅस्टिकचे हातमोजे घालावेत. पेटी उघडण्याआधी प्रथम गेट काढून बाजूला करावे. नंतर मधुकोठीतील एक एक फ्रेम काढून तपासावी. मधुकोठीतील पोळ्यावर मध तयार झाला आहे काय, मधाची घरे सीलबंद आहेत काय, हे पाहावे. नंतर मधुकोठीचा भाग सर्व पोळ्यांसहित खाली ठेवलेल्या झाकणावर थोडा तिरपा करून हळूच ठेवावा. आता पिलावळ कोठीची तपासणी करावी. वरीलप्रमाणेच एक एक फ्रेम करुन पोळ्याचे निरीक्षण करावे.



पोळ्यांवर माश्यांची संख्या, पराग कोठ्या व मध योग्य प्रमाणात असायला हवे. या फ्रेमवरील पोळे काळे पडले आहे काय, पोळ्यांना मेणकिडा लागला आहे काय, या बाबींचे निरीक्षण खूप महत्त्वाचे आहे. मेणकिडा लागला असल्यास मेणकिड्यासहित असे खराब पोळे काढून टाकावे. फ्रेमच्या फटीमध्ये तसेच पेटीच्या फटीमध्ये मेणकिड्याची मादी अंडी घालत असते. त्या ठिकाणी अळ्या तयार होतात. मेणकिड्याचा कोषही फटीमध्ये असतो, त्याचे निरीक्षण करून हातातील चाकूने मेणकिडा कोष व अळ्या मारून टाकाव्यात. पोळ्यांतील षटकोनी घरांमध्ये अळ्या व कोष दिसतात काय, अंडी दिसतात काय, हे पाहावे. एका घरात एकच अंडे असायला हवे. कधीकधी एका घरात दोन किंवा तीन अंडी दिसतात. अशा वेळी समजावे की त्या वसाहतीमध्ये राणी नाही. म्हणजेच कामकरी माश्या अंडी देत आहेत. (याला लेईंग वर्कर असे म्हणतात अशा वसाहतीला नवीन राणीघर देण्याची गरज असते.) तपासणी करताना नरांची घरे आणि घरांची संख्या जास्त तर नाही ना हे पाहावे. नवीन राणीघर तयार होत आहे का, हे पण बघावे. नवीन राणीघर तयार होणे आणि त्याचवेळी नरांची संख्या वाढणे म्हणजे वसाहत विभाजनाच्या मार्गावर आहे असे समजावे.

वसाहतीतीत माश्यांची संख्या खूप झाली असेल तर माश्या विभाजनासाठी नवीन राणी तयार केली जाते. ही नवीन राणी जुन्या वसाहतीत राहते आणि जुनी राणी काही माश्या घेऊन वसाहत सोडून जाते. काही वेळा राणी म्हातारी झालेली असते; ती मरण्यापूर्वी दुसरी राणी तयार करत असते. पेटीमध्ये झुरळे, पाली दिसल्यास मारून टाकावीत.



**मधमाश्यांना कृत्रिम खाद्यपुरवठा :** निसर्गात वेगवेगळ्या हंगामात होणाऱ्या वनस्पतींपासून मधमाश्यांना खाद्य मिळत असते. मात्र ढगाळ हवामान, पाऊस, वेगाचा वारा यामुळे फुलोऱ्यावर अनिष्ट परिणाम होऊन

पुरेसे खाद्य मिळत नाही. त्यामुळे वसाहतीत खाद्याची कमतरता जाणवू शकते. अशा वेळी त्यांना कृत्रिम खाद्याचा पुरवठा करणे आवश्यक असते. गरजेच्या वेळी माश्यांना खाद्य दिले नाही तर वसाहतीची वाढ खुंटते. पिलावा कमी होतो, वसाहत अशक्त बनते व मधनिर्मिती होत नाही. अशा वसाहती गृहत्याग करतात.

**खाद्य देण्याची पद्धत :** कृत्रिम खाद्य तयार करताना एका वसाहतीसाठी ५० ग्रॅम साखर व ५० मि.ली. पाणी घेऊन त्याचा पाक बनवावा. हा पाक थंड झाल्यावर संध्याकाळच्या वेळी पेटीचे झाकण काढून बशीतून पेटीत ठेवावा. बशीमध्ये झाडाची पाने किंवा काड्या ठेवाव्यात. म्हणजे त्यावर चढून माश्या पाक घेतील. पाक घेण्यासाठी माश्यांमध्ये आपापसात संघर्ष होऊ नये म्हणून संध्याकाळच्या वेळेस एकाच दिवशी सर्व पेट्यांमध्ये पाक द्यावा. हा पाक मधमाश्यांनी लगेच संपवून टाकल्यास तीन ते चार दिवसांनी पुन्हा दुसरा हप्ता द्यावा. यामुळे वसाहतीतील पिलावा संगोपनाचे काम चालू राहून वसाहती गृहत्याग करणार नाहीत. नवीन पकडलेल्या वसाहतीत खाद्यसाठा नसतो तसेच माश्यांना त्रास झालेला असतो. अशा वसाहती स्थिर होण्यासाठी दोन ते तीन दिवस अंतराने साखर पाकाचे तीन हप्ते द्यावे.

**मध काढण्याचे तंत्र :** मध निष्कासन यंत्राचा वापर करून शास्त्रशुद्ध आणि अहिंसक पद्धतीने मध काढला जातो. यासाठी प्रथम मधुकोठीमधील जी पोळी सील झालेली आहेत, अशी पोळी घेऊन त्या पोळ्याच्या दोन्ही बाजूवरील सील सुरीने व्यवस्थित कापावे व पोळीसहित फ्रेम मधयंत्रात ठेवावी. एकावेळी चार ते सहा प्रेम ठेवता येतात. मधयंत्राच्या बाहेरील बाजूला असलेला हँडल सुरुवातीला हळूहळू फिरवत नंतर वेग वाढवत जावा. असे वीस ते पंचवीस फेरे झाल्यावर उलट्या दिशेने हॅण्डल फिरवावा. म्हणजे पोळ्याच्या दोन्ही बाजूचा मध निघतो. हॅण्डल एकदम जोरात फिरवू नये, तसेच झटक्यात बंद करू नये. त्यामुळे पोळी मोडण्याची व खराब होण्याची शक्यता असते.



यंत्रातून काढलेला मध स्वच्छ कपड्यातून किंवा तारेच्या चाळणीतून गाळून काचेच्या बाटलीत साठवून ठेवावा. मध काढल्यानंतर मधाच्या चौकटी रिकाम्या होतात. त्या पुन्हा मधुकोठीमध्ये ठेवून द्याव्यात. या पद्धतीने मध काढल्यास मधमाश्यांची अंडी, पिलावा किंवा इतर पदार्थ मधात मिसळत नाहीत. तसेच मधमाश्या न मरता शुद्ध मध मिळतो. मध काढून झाल्यावर मध पोळे फ्रेमसहित पुन्हा मधुकोठीत ठेवावे. म्हणजे माश्या पुन्हा त्यात मध भरण्याचे काम करतात. एक किलो मेण तयार करण्यासाठी मधमाश्यांना १० ते १२ किलो मधाचे सेवन करावे लागते. मधमाश्यांचे हे कष्ट कमी करून जास्त मध मिळवण्यासाठी रिकामी पोळी (खराब होत नाही तोपर्यंत) पुन्हा पुन्हा वापरावी. ■